श्रीमद् भागवत का यह सार
भगवद् भक्ति ही आधार

# श्रीमद्भागवत रसिक कुटुंब

## भ्रमरगीत (10.47)



तरुण गोपियों का दुःख हरने लेकर प्रभु संदेश,
ब्रज में पहुंचे ज्ञानी उद्धव हरने सबका क्लेश

**नारायणं(न्) नमस्कृत्य, नरं(ञ्) चैव नरोत्तमम्।**
**देवीं(म्) सरस्वतीं(वँ) व्यासं(न्), ततो जयमुदीरयेत्**

**नामसङ्कीर्तनं(यँ) यस्य, सर्वपापप्रणाशनम्।**
**प्रणामो दुःखशमनस्, तं(न्) नमामि हरिं(म्) परम्**

**श्रीमद्भागवतमहापुराणम्**

**दशमः स्कंधः**

**॥ अथ सप्तचत्वारिंशोऽध्यायः॥**

**श्रीशुक उवाच**

**तं(वँ) वीक्ष्य कृष्णानुचरं(वँ) व्रजस्त्रियः(फ्)**
**प्रलम्बबाहुं(न्) नवकं(ञ्)जलोचनम् ।**
**पीताम्बरं(म्) पुष्करमालिनं(लँ) लसन्-**
**मुखारविन्दं(म्) मणिमृष्टकुण्डलम् ॥ 1॥**

प्रलम्+बबाहुं(न्), नवकं(ञ्)जलो+चनम् ,
पुष्+करमा+लिनं(लँ), मुखा+रविन्दं(म्), मणिमृष्ट+कुण्डलम्

श्री शुकाचार्य म्हणतात - गोपींनी श्रीकृष्णांचा सेवक असलेल्या उद्धवाला पाहिले .त्याचे हात गुडघ्यापर्यंत लांब होते .ताज्या कमल दलाप्रमाणे प्रसन्न नेत्र होते .त्याने पितांबर धारण केला होता .त्याच्या गळ्यात कमळांची माळ व कानांमध्ये रत्नजडित कुंडले झगमगत होती आणि मुख कमल प्रफुल्लित होते .

शुचिस्मिताः(ख्) कोऽयमपीच्यदर्शनः(ख्)
कुतश्च कस्याच्युतवेषभूषणः ।
इति स्म सर्वाः(फ्) परिवव्रुरुत्सुकास्-
तमुत्तमश्लोकपदाम्बुजाश्रयम् ॥ 2॥

कोऽ+यमपीच्+यदर्शनः(ख्), कस्याच्+युतवे+षभू+षणः ,

परिवव्रु+रुत्+सुकास् , तमुत्+तमश्+लो+कपदाम्+बुजाश्रयम्

गोपी आपापसात म्हणू लागल्या , "हा पुरुष अतिशय देखणा आहे .परंतु हा आहे कोण ?कुठून आला ?कोणाचा दूत आहे ?याने श्रीकृष्णांसारखी वेशभूषा कशासाठी धारण केली आहे ? "हे सर्व जाणून घेण्यासाठी गोपी उत्सुक झाल्या आणि पवित्र कीर्ती श्रीकृष्णांच्या चरण कमलांचा आश्रित असणाऱ्या उद्धवाला चारी बाजूंनी घेरून पवित्र स्मित करीत उभ्या राहिल्या .

तं(म्) प्रश्रयेणावनताः(स्) सुसत्कृतं(म्)
सव्रीडहासेक्षणसूनृतादिभिः ।
रहस्यपृच्छन्नुपविष्टमासने
विज्ञाय सन्देशहरं(म्) रमापतेः ॥ 3॥

प्रश्रयेणा+वनताः(स्), सुसत्+कृतं(म्), सव्रीडहासे+क्षणसू+नृता+दिभिः,

रहस्+यपृच्छन्+नुपविष्टमा+सने

हा रमारमनांचा संदेश घेऊन आला आहे ,असे जेव्हा त्यांना समजले ,तेव्हा त्यांनी अत्यंत विनम्रपणे ,लज्जेने स्मितहास्य करीत त्याच्याकडे पाहून मधुर भाषणाने त्याचा चांगला सत्कार केला आणि एकांतात तो आसनावर बसल्यावर त्याला त्यांनी विचारले .

जानीमस्त्वां(यँ) यदुपतेः(फ्), पार्षदं(म) समुपागतम् ।
भर्त्रेह प्रेषितः(फ्) पित्रोर्-भवान् प्रियचिकीर्षया ॥ 4॥

जानी+मस्त्वां(यँ), समुपा+गतम् , प्रियचिकीर्+षया

"उद्धवा !आपण यदुनाथांचे दूत आहात .आपल्या स्वामींनी ,त्यांच्या मातापित्यांना खुशाली कळविण्यासाठी आपल्याला येथे पाठविले आहे ,हे आम्हाला कळले .

अन्यथा गोव्रजे तस्य, स्मरणीयं(न्) न चक्ष्महे ।
स्नेहानुबन्धो बन्धूनां(म्), मुनेरपि सुदुस्त्यजः ॥ 5॥

स्नेहा+नुबन्धो, सुदुस्+त्यजः

नाहीतर ,आता या गोकुळात त्यांना आठवण यावी ,अशी दुसरी वस्तू आम्हाला दिसत नाही .बांधवांवरचे प्रेम मुनीला सुद्धा सोडणे कठीण असते .

अन्येष्वर्थकृता मैत्री, यावदर्थविडम्बनम् ।

पुम्भिः(स्) स्त्रीषु कृता यद्वत्, सुमनस्स्विव षट्पदैः ॥ 6॥

अन्येष्+वर्+थकृता, यावदर्थ+विडम्बनम्, यद्+वत, सुमनस्+स्विव

मातापित्यानखेरीस इतरांबरोबर प्रेम संबंधांचे जे सोंग आणले जाते ,ते स्वार्थासाठीच असते .जसे भ्रमरानचे फुलांवर प्रेम असते तसेच पुरुषांचे स्त्रिया वरील प्रेम .

निस्स्वं(न्) त्यजन्ति गणिका, अकल्पं(न्) नृपतिं(म्) प्रजाः ।

अधीतविद्या आचार्य- मृत्विजो दत्तदक्षिणम् ॥ 7॥

निस्+स्वं(न्), अधी+तविद्या, मृत्+विजो, दत्त+दक्षिणम्

धन संपलेल्या माणसाला गणिका ,रक्षण करून शकणाऱ्या राजाला प्रजा 'शिक्षण पूर्ण झाल्यावर विद्यार्थी गुरुला आणि दक्षिणा मिळाली की ऋत्विजयजमानाला सोडून देतात .

खगा वीतफलं(वँ) वृक्षं(म्), भुक्त्वा चातिथयो गृहम् ।

दग्धं(म्) मृगास्तथारण्यं(ञ्), जारो भुक्त्वा रतां(म्) स्त्रियम् ॥ 8॥

भुक्+त्वा, मृगास्+तथा+रण्यं(ञ्)

पक्षी फळे नसलेल्या झाडाला ,भोजन झाल्यावर अतिथी गृहस्थाला ,पशु जळलेल्या जंगलाला आणि जार पुरुष उपभोगानंतर स्त्रीला सोडून जातात .

इति गोप्यो हि गोविन्दे, गतवाक्कायमानसाः ।

कृष्णदूते व्रजं(यँ) याते, उद्धवे त्यक्तलौकिकाः ॥ 9॥

गतवाक्का+यमानसाः, उद्+धवे, त्यक्+तलौ+किकाः

गायन्त्यः(फ्) प्रियकर्माणि, रुदत्यश्च गतह्रियः ।

तस्य सं(म्)स्मृत्य सं(म्)स्मृत्य, यानि कैशोरबाल्ययोः ॥ 10॥

गा+यन्+त्यः(फ्), रुदत्+यश्च, गतह्+रियः, कैशो+रबाल्+ययोः

गोपींचे मन ,वाणी आणि शरीर श्रीकृष्णांमध्येच तल्लीन झालेले होते .श्रीकृष्णांचा दूत म्हणून जेव्हा उद्धव व्रजभूमी मध्येआला तेव्हा त्या लोक व्यवहार विसरल्या आणि श्रीकृष्णांनी बालपणापासून किशोर अवस्थेपर्यंत जितक्या म्हणून लीला केल्या होत्या .त्या सर्वांची आठवण कर करून त्या लीलांचे गायन करू लागल्या .शिवाय संकोच सोडून रडूही लागल्या .

काचिन्मधुकरं(न्) दृष्ट्वा, ध्यायन्ती कृष्णसं(ङ्)गमम् ।

प्रियप्रस्थापितं(न्) दूतं(ङ्), कल्पयित्वेदमब्रवीत् ॥ 11॥

काचिन्+मधुकरं(न्), कृष्ण+सं(ङ्)गमम् प्रियप्रस्+थापितं(न्), कल्प+यित्वे+दमब्रवीत्

एका गोपीला श्रीकृष्ण भेटल्याचे स्मरण झाले .त्यावेळी एका भ्रमराला गुणगुणताना पाहून तिला वाटले की ,आपली मनधरणी करण्यासाठी प्रियतमाने याला दूत म्हणून पाठविले आहे .ती त्याला म्हणाली .

## गोप्युवाच

**मधुप कितवबन्धो मा स्पृशाङ्घ्रिं(म्) सपत्न्याः(ख्)**

**कुचविलुलितमालाकुङ्कुमश्मश्रुभिर्नः ।**

**वहतु मधुपतिस्तन्मानिनीनां(म्) प्रसादं(यँ)**

**यदुसदसि विडम्ब्यं(यँ) यस्य दूतस्त्वमीदृक् ॥ 12॥**

कुचविलुलित+माला+कुङ्कुमश्+मश्रुभिर्नः, मधुपतिस्तन्+मानिनीनां(म्), दूतस्+त्वमी+दृक्

गोपी म्हणाली -अरे कपटी प्रिय कराच्या सख्या मधु करा !तू आमच्या पायांना स्पर्श करून नमस्कार करू नकोस .कारण श्रीकृष्णांची जीवनमाला आमच्या सवतीच्या वक्षःस्थळाच्याघर्षणाने चुरगळली गेली ,तिच्या पक्षाला लावलेले व माळेला लागलेले पिवळे केशर तुझ्या निशांना सुद्धा लागले आहे .मधुपती श्रीकृष्ण मथुरे येथील माने नाईकांची मनधरणी करू दे आणि त्यांचा जो केशर रूप प्रसाद ,ज्याचा यादव सभेत उपहास होणार आहे ,तो त्यांच्या जवळच राहू दे !तो तुझ्याकडून येथे पाठविण्याची काय आवश्यकता आहे ?

**सकृदधरसुधां(म्) स्वां(म्) मोहिनीं(म्) पाययित्वा**

**सुमनस इव सद्यस्तत्यजेऽस्मान् भवादृक् ।**

**परिचरति कथं(न्) तत्पादपद्मं(न्) तु पद्मा**

**ह्यपि बत हृतचेता उत्तमश्लोकजल्पैः ॥ 13॥**

सकृद+धरसुधां(म्), सद्यस्+तत्+यजेऽस्+मान् , तत्पा+दपद्मं(न्), उत्तमश्+लो+कजल्पैः

तू फुलांतील मध एकदा घेऊन उडून जातोस, तसेच तेही फक्त एकदाच आपले मोहक अधरामृत पाजून आम्हाला सोडून निघून गेले.बिचारी लक्ष्मी त्यांच्या चरण कमलांची सेवा कशी करते कोण जाणे!बहुदा श्री कृष्णांच्या गोड गोड बोलण्याने तिचे सुद्धा चित्त चोरले गेले असावे(म्हणूनच तिला त्यांचे खरे रूप कळले नाही.)

**किमिह बहु षडङ्घ्रे गायसि त्वं(यँ) यदूना-**

**मधिपतिमगृहाणामग्रतो नः(फ्) पुराणम् ।**

**विजयसखसखीनां(ङ्) गीयतां(न्) तत्प्रसं(ङ्)गः**

**क्षपितकुचरुजस्ते कल्पयन्तीष्टमिष्टाः ॥ 14॥**

मधिपति+मगृहाणा+मग्रतो, विजय+सख+सखीनां(ङ्),

तत्+प्रसं(ङ्)गः, क्षपित+कुच+रुजस्ते, कल्पयन्+तीष्टमिष्टाः

अरे भ्रमरा !वनात राहणाऱ्या आमच्यासमोर तू यदुपती श्रीकृष्णांचे पुष्कळ से गुण का गात आहेस ?ते आम्हाला काही नवीन नाहीत.ज्यांच्याजवळ सदा विजय असतो,त्या श्रीकृष्णांच्या नव्या सख्यांच्या समोर जाऊन त्यांचे गुणगान कर .कारण यावेळी त्यांनी त्यांच्या हृदयाची पीडा शमविली असल्याने त्या त्यांना प्रिय आहेत .तू करीत असलेल्या गुणगाणावर प्रसन्न होऊन तू मागशील ती वस्तू त्या तुला देतील .

**दिवि भुवि च रसायां(ङ्) काः(स्) स्त्रियस्तद्दुरापाः(ख्)**

**कपटरुचिरहासभ्रूविजृम्भस्य याः(स्) स्युः ।**

**चरणरज उपास्ते यस्य भूतिर्वयं(ङ्) का**

**अपि च कृपणपक्षे ह्युत्तमश्लोकशब्दः ॥ 15॥**

स्त्रियस्+तद्दुरापाः(ख्), कपट+रुचिरहा+सभ्रूविजृम्+भस्य, ह्युत्तमश्+लो+कशब्दः

हे भ्रमरा !त्यांचे कपट पूर्ण मनोहर हास्य आणि भुवयांच्या इशाराने त्यांना वश होणार नाहीत ;अशा स्वर्गात ,पृथ्वीवर किंवा पाताळात कोणत्या स्त्रिया आहेत ?स्वतः लक्ष्मी सुद्धा ज्यांच्या चरणरज्यांची सेवा करीत असते ,तिच्यापुढे आमची काय योग्यता?परंतु तू त्यांना सांग की,तुमचे नाव 'उत्तम श्लोक 'आहे,ते दिनांवर दया करण्यामुळे .त्याला मात्र बट्टा लागेल .

**विसृज शिरसि पादं(वँ) वेद्म्यहं(ञ्) चाटुकारै-**

**रनुनयविदुषस्तेऽभ्येत्य दौत्यैर्मुकुन्दात् ।**

**स्वकृत इह विसृष्टापत्यपत्यन्यलोका**

**व्यसृजदकृतचेताः(ख्) किं(न्) नु सन्धेयमस्मिन् ॥ 16॥**

रनुनय+विदुषस्+तेऽभ्येत्य, दौत्यैर्+मुकुन्+दात् ,

विसृष्टा+पत्य+पत्यन्+यलोका, व्यसृजद+कृतचेताः(ख्), सन्धे+यमस्+मिन्

अरे मधु करा !तू माझ्या पायावर डोके टेकवू नकोस .तू मनधरणी करण्यात पटाईत आहेस .हे मी जाणते .दूताने काय केले पाहिजे ,हे मला माहित आहे .परंतु ज्यांनी त्यांच्यासाठीच आपल्या पती ,पुत्र आणि अन्य नातेवाईकांना सोडले ,अशा व्यक्तीशी आम्ही कशी तडजोड करावी ?

**मृगयुरिव कपीन्द्रं(वँ) विव्यधे लुब्धधर्मा,**

**स्त्रियमकृत विरूपां(म्) स्त्रीजितः(ख्) कामयानाम् ।**

**बलिमपि बलिमत्त्वावेष्टयद् ध्वां(ङ्)क्षवद् यस्-**

**तदलमसितसख्यैर्दुस्त्यजस्तत्कथार्थः ॥ 17॥**

लुब्ध+धर्मा, स्त्रिय+मकृत, बलिमत्+त्वा+वेष्टयद् ,

तदल+मसित+सख्यैर्+दुस्+त्यजस्+तत्कथार्थः

अरे ए मधु करा !त्यांचा जेव्हा रामावतार होता,तेव्हा त्यांनी कपिराज वालीला व्याधा प्रमाणे लपून मारले .शूर पणखा त्यांची कामना करीत होती,परंतु त्यांनी पत्नी प्रेमामुळे त्या बिचाऱ्या स्त्रीचे कान -नाक कापून तिला कुरूप केले .कावळा जसा बळी घालणाऱ्याचा बळी खाऊन पुन्हा त्यालाच त्रास देतो,त्याप्रमाणे बली कडून वामन रूपाने दान घेऊन पुन्हा त्यालाच वरून पाशाने बांधून पाताळा ढकलले.म्हणून या काळ्याशी आता मैत्रीपुरे झाली.परंतु काय करणार?आमची इच्छा नसली तरी आम्ही त्यांच्याविषयीच्या गोष्टी टाळू तर शकत नाही ना !

**यदनुचरितलीलाकर्णपीयूषविप्रुट्-**

**सकृददनविधूतद्वन्द्वधर्मा विनष्टाः ।**

**सपदि गृहकुटुम्बं(न्) दीनमुत्सृज्य दीना**

**बहव इह विहं(ङ्)गा भिक्षुचर्यां(ञ्) चरन्ति ॥ 18॥**

**यदनु+चरित+लीला+कर्णपीयू+षविप्रुट् सकृद+दनविधू+तद्वन्द्व (तद्+वन्+द्व)+धर्मा, दीनमुत्+सृज्य**

**श्रीकृष्णांच्या लीला रूप कर्णामृताच्या एका थेंबाचेही जे फक्त एकदाच प्राशन करतात,त्यांची राग -द्वेषादी सगळी द्वंद्वेसमूळ नाहीशी होऊन ते असून नसल्यासारखेच होतात .एवढेच काय,पण पुष्कळचे लोक आपला दुःखमय प्रपंच तत्काळ सोडून अकिंचन होतात आणि सारासार विवेक करणाऱ्या हंसाप्रमाणे परम हंसाचे जीवन जगतात.(आमचीही अवस्था अशीच झाली आहे.)**

**वयमृतमिव जिह्मव्याहृतं(म्) श्रद्दधानाः(ख्)**

**कुलिकरुतमिवाज्ञाः(ख्) कृष्णवध्वो हरिण्यः ।**

**ददृशुरसकृदेतत्तन्नखस्पर्शतीव्र-**

**स्मररुज उपमन्त्रिन् भण्यतामन्यवार्ता ॥ 19॥**

**जिह्+मव्या+हृतं(म्), कुलिक+रुतमि+वाज्ञाः(ख्), कृष्ण+ वध्वो,**

**ददृशुर+ सकृदे+ तत्तन्+ नखस् + पर्शतीव्र, उपमन्+ त्रिन् , भण्यता+ मन्यवार्ता**

**जशा काळविटाच्या भोळ्या माद्या हरीनी ,कपटी व्याधाच्या मधुर गाण्यांवर विश्वास ठेवल्यामुळे त्याच्या बाणांनी युद्ध होतात ,त्याचप्रमाणे आम्ही श्रीकृष्णांच्या प्रेयसी गोपी सुद्धा त्या कपटीकृष्णांचे गोड गोड कपटी बोलणे खरे समजलो आणि त्यांच्या नखस्पर्शाने उत्पन्न झालेल्या तीव्र प्रेमव्याधीचा वारंवार अनुभव घेत राहिलो .म्हणून हे उपमंत्र्या !आता तू त्यांच्याशिवाय दुसरे काहीही सांग !**

**प्रियसख पुनरागाः(फ्) प्रेयसा प्रेषितः(ख्) किं(वँ)**

**वरय किमनुरुन्धे माननीयोऽसि मेऽङ्ग ।**

**नयसि कथमिहास्मान् दुस्त्यजद्वन्द्वपार्श्वं(म्)**

**सततमुरसि सौम्य श्रीर्वधूः(स्) साकमास्ते ॥ 20॥**

**किमनु+रुन्धे, माननी+योऽसि, कथमिहास्+मान्, दुस्त्यज+द्वन्द्वपार्श्वं(म्)**

**हे प्रियतमाच्या सख्या !तू त्यांच्याकडे जाऊन परत आलास ,वाटते .आमची मनधरणी करण्यासाठीच आमच्या प्रियतमाने तुला पुन्हा पाठविले काय ?प्रिय भ्रमरा !तू आम्हाला आदरणीय आहेस ,म्हणून तुला जे पाहिजे ते माग .अरे !ज्यांच्याकडे एकदा गेल्यानंतर परत येणे अतिशय कठीण ,अशा आम्हाला येथून तेथे नेऊन काय करणार आहेस ?बाबा रे !त्यांच्याजवळ ,त्यांच्या वक्ष :स्थळावरत्यांची प्रिय पत्नी लक्ष्मी नेहमी राहात असते ना ?**

**अपि बत मधुपुर्यामार्यपुत्रोऽधुनाऽऽस्ते**

**स्मरति स पितृगेहान् सौम्य बन्धूं(म्)श्च गोपान् ।**

**क्वचिदपि स कथा नः(ख्) किं(ङ्)करीणां(ङ्) गृणीते**

**भुजमगुरुसुगन्धं(म्) मूर्ध्न्यधास्यत् कदा नु ॥ 21॥**

**मधुपुर्या+मार्यपुत्रोऽ+धुनाऽऽस्ते, भुजम+गुरुसु+गन्धं(म्), मूर्ध्न्यधा+स्यत्**

हे मधु करा !आम्हाला हे सांग की ,आर्यपुत्र सध्या मथुरेत आहेत ना ?आई बाबा, नातलग,आणि गोपाळांची कधी त्यांना आठवण येते का ?आणि आम्ही दासीन विषयी ते कधी काही सांगतात काय ?आणि अगुरू सारखेसुगंधी करकमल ते कधी आमच्या मस्तकावर ठेवतील काय ?

## श्रीशुक उवाच

**अथोद्धवो निशम्यैवं(ङ्), कृष्णदर्शनलालसाः ।**

**सान्त्वयन् प्रियसन्देशैर्- गोपीरिदमभाषत ॥ 22॥**

अथोद्+धवो, निशम्+यैवं(ङ्), कृष्ण+दर्शन+लालसाः, सान्+त्वयन् ,प्रियसन्+देशैर् , गोपी+रिदमभा+षत

श्री शुकम्हणतात -श्रीकृष्णांच्या दर्शनाला लाल चावलेल्या गोपींचे हे म्हणणे ऐकून उद्धव आणि त्यांना त्यांच्या प्रियतमाचा संदेश सांगून,त्यांचे सांत्वन करीत म्हटले .

## उद्धव उवाच

**अहो यूयं(म्) स्म पूर्णार्था, भवत्यो लोकपूजिताः ।**

**वासुदेवे भगवति, यासामित्यर्पितं(म्) मनः ॥ 23॥**

लोकपू+जिताः, यासा+मित्यर्+पितं(म्)

उद्धव म्हणाला - गोपींनो !तुम्ही कृतकृत्य आहात .साऱ्या जगाला तुम्ही पूजनीय आहात .कारण तुम्ही भगवान श्रीकृष्णांना अशा प्रकारे आपले मन समर्पित केले आहे .

**दानव्रततपोहोम- जपस्वाध्यायसं(यँ)यमैः ।**

**श्रेयोभिर्विविधैश्चान्यैः(ख्), कृष्णे भक्तिर्हि साध्यते ॥ 24॥**

दानव्रत+तपोहोम, जपस्+वाध्या+यसं(यँ)यमैः, श्रेयो+भिर्विविधैश्+चान्यैः(ख्)

दान,व्रत,तप,होम,जप,वेदाध्ययन,ध्यान ,धारणा ,समाधी आणि कल्याणाच्या विविध उपायांच्या द्वारा भगवंतांची भक्ती प्राप्त व्हावी,एवढाच उद्देश असतो .

**भगवत्युत्तमश्लोके, भवतीभिरनुत्तमा ।**

**भक्तिः(फ्) प्रवर्तिता दिष्ट्या, मुनीनामपि दुर्लभा ॥ 25॥**

भगवत्+युत्+तमश्+लोके, भवती+भिरनुत्तमा, मुनीना+मपि

तुमची पवित्र कीर्ती भगवान श्रीकृष्णांच्या ठिकाणी मुनींना सुद्धा दुर्लभ अशी सर्वोत्तम भक्ती आहे आणि तिचा आदर्श तुम्ही लोकांपुढे ठेवला आहे ,ही मोठी भाग्याचीच गोष्ट आहे .

**दिष्ट्या पुत्रान् पतीन् देहान्, स्वजनान् भवनानि च ।**

**हित्वावृणीत यूयं(यँ) यत्, कृष्णाख्यं(म्) पुरुषं(म्) परम् ॥ 26॥**

हित्वा+वृणीत, कृष्णा+ख्यं(म्)

ही किती भाग्याची गोष्ट आहे की,तुम्ही पुत्र,पती"शरीर,वजन आणि घरे सोडून पुरुषोत्तम भगवान श्री कृष्णांना वरले आहे .

सर्वात्मभावोऽधिकृतो, भवतीनामधोक्षजे ।

विरहेण महाभागा, महान् मेऽनुग्रहः(ख्) कृतः ॥ 27॥

सर्वात्+मभावोऽ+धिकृतो, भवती+नामधो+क्षजे

हे भाग्यशाली गोपींनो !श्रीकृष्णांच्या विरोगात तुमची त्यांच्या ठिकाणी जी एकांत भक्ती जडली ,तिचे दर्शन मला झाले ,ही माझ्यावर तुमची मोठी कृपाच होय .

श्रूयतां(म्) प्रियसन्देशो, भवतीनां(म्) सुखावहः ।

यमादायागतो भद्रा, अहं(म्) भर्तू रहस्करः ॥ 28॥

प्रियसन्+देशो, सुखा+वहः, यमादा+यागतो, रहस्+करः

मी स्वामींचे गुप्त काम करणारा दूत आहे .देवींनो !प्रियतमा श्रीकृष्णाने तुम्हाला आनंद देण्यासाठी एक संदेश पाठविला आहे .तोच घेऊन मी तुमच्याकडे आलो आहे .तो ऐका !

श्रीभगवानुवाच

भवतीनां(वँ) वियोगो मे, न हि सर्वात्मना क्वचित् ।

यथा भूतानि भूतेषु, खं(वँ) वाय्वग्निर्जलं(म्) मही ।

तथाहं(ञ्) च मनः(फ्)प्राणभूतेन्द्रियगुणाश्रयः ॥ 29॥

वाय्वग्+निर्जलं(म्), मनः(फ्)प्रा+णभूतेन्+द्रियगुणा+श्रयः

श्रीकृष्णांनी सांगितले आहे-तुमचा माझ्याशी पूर्णपणे कधीही वियोग होऊ शकत नाही .सर्व भौतिक पदार्थांमध्ये ज्याप्रमाणे आकाश,वायु,अग्नी,जल आणि पृथ्वी ही पंचमहाभूते व्यापून आहे,त्याचप्रमाणे मी मन,प्राण ,पंचमहाभुते ,इंद्रिये आणि त्यांच्या विषयांचा आश्रय आहे .

आत्मन्येवात्मनाऽऽत्मानं(म्),सृजे हन्म्यनुपालये ।

आत्ममायानुभावेन, भूतेन्द्रियगुणात्मना ॥ 30॥

आत्मन्+येवात्+मनाऽऽत्+मानं(म्), हन्+म्यनु+पालये, आत्ममाया+नुभावेन, भूतेन्+द्रियगुणात्+मना

मीच आपल्या मायेच्या द्वारे पंचमहाभूते ,इंद्रिये आणि त्यांच्या विषयांच्या रुपाने स्वतःमध्ये स्वतःलाच उत्पन्न करतो .पाळतो आणि विलीन करतो .

आत्मा ज्ञानमयः(श्) शुद्धो, व्यतिरिक्तोऽगुणान्वयः ।

सुषुप्तिस्वप्नजाग्रद्भिर्- मायावृत्तिभिरीयते ॥ 31॥

व्यतिरिक्तोऽ+गुणान्+वयः, सुषुप्तिस्+वप्नजा+ग्रद्+भिर्, माया+वृत्तिभिरी+यते

माळी पासून वेगळा असलेला आत्मा विशुद्ध ज्ञान स्वरूप असून त्रिगुणांशी त्याचा संबंध नाही.तथापि सुषुप्ती,स्वप्न व जागृती या मायेच्या तीन वृत्तींमुळे तो प्रत्ययाला येतो .

येनेन्द्रियार्थान् ध्यायेत, मृषा स्वप्नवदुत्थितः ।

तन्निरुन्ध्यादिन्द्रियाणि, विनिद्रः(फ्) प्रत्यपद्यत ॥ 32॥

येनेन्+द्रियार्+थान् ,स्वप्न+वदुत्थितः, तन्+निरुन्+ध्या+दिन्द्रियाणि, प्रत्य+पद्यत

जागा झालेला मनुष्य स्वप्नात दिसलेले पदार्थ ज्या मनाने खोटे आहेत हे जाणतो ,त्याचप्रमाणे प्रत्यक्ष दिसणारे पदार्थही खोटे आहेत ,असा त्याच मनाने निश्चय करून निरलसपणे इंद्रियांना विषयांपासून आवरावे .

**एतदन्तः(स्) समाम्नायो, योगः(स्) सां(ङ्)ख्यं(म्) मनीषिणाम् ।**

**त्यागस्तपो दमः(स्) सत्यं(म्),समुद्रान्ता इवापगाः ॥ 33॥**

समाम्+नायो, मनी+षिणाम् , त्यागस्+तपो

सर्व नद्या ज्याप्रमाणे वेगवेगळ्या मार्गांनी वाहत जाऊन समुद्रालाच मिळतात ,त्याचप्रमाणे ज्ञानी माणसांचा वेदाभ्यास ,योग ,आत्मानात्म विवेक ,त्याग ,तपश्चर्या ,इंद्रिय संयम ,सत्य इत्यादी सर्वांचे खरे फळ मनाचा निग्रह करून परमात्म्याला मिळणे ,हेच आहे

**यत्त्वहं(म्) भवतीनां(वँ) वै, दूरे वर्ते प्रियो दृशाम् ।**

**मनसः(स्) सन्निकर्षार्थं(म्), मदनुध्यानकाम्यया ॥ 34॥**

यत्+त्वहं(म्), सन्+निकर्+षार्थं(म्), मदनुध्या+नकाम्यया

गोपींनो !मी तुम्हाला प्रिय असूनही तुमच्या दृष्टी पासून दूर राहतो .याचे कारण तुम्ही नेहमी माझे ध्यान करीत राहण्यामुळे मनाने अगदी माझ्याजवळ राहण्याचा तुम्हाला अनुभव यावा ,म्हणून .

**यथा दूरचरे प्रेष्ठे, मन आविश्य वर्तते ।**

**स्त्रीणां(ञ्) च न तथा चेतः(स्), सन्निकृष्टेऽक्षिगोचरे ॥ 35॥**

सन्+निकृष्टेऽ+क्षिगोचरे

कारण स्त्रियांचे चित्र आपल्या दूरदेशी असलेल्या प्रियतमाच्या ठाई जितके गुंतून राहते ,तितके जवळ डोळ्यांसमोर राहणाऱ्यांच्या ठिकाणी लागत नाही .

**मय्यावेश्य मनः(ख्) कृत्स्नं(वँ), विमुक्ताशेषवृत्ति यत् ।**

**अनुस्मरन्त्यो मां(न्) नित्य- मचिरान्मामुपैष्यथ ॥ 36॥**

विमुक्ता+शेषवृत्ति, अनुस्+मरन्त्यो, मचिरान्+मामुपैष्+यथ

कोणतीही वृत्ती मनात उठून देता संपूर्ण मन माझ्या ठिकाणी लावून जेव्हा तुम्ही माझे स्मरण कराल ,तेव्हा लवकरच कायमच्या मला प्राप्त व्हाल .

**या मया क्रीडता रात्र्यां(वँ), वनेऽस्मिन् व्रज आस्थिताः ।**

**अलब्धरासाः(ख्) कल्याण्यो, माऽऽपुर्मद्वीर्यचिन्तया ॥ 37॥**

अलब्+धरासाः(ख्), माऽऽपुर्+मद्वीर्+यचिन्+तया

हे कल्याणींनो !ज्यावेळी मी वृंदावनामध्ये पौर्णिमेच्या रात्री रासक्रीडा केली होती ,त्यावेळी ज्या गोपी सजनांनी येऊन दिल्यामुळे प्रजातच राहिल्या व माझ्याबरोबर रासक्रीडेत सामील होऊ शकल्या नाहीत ,त्या माझ्या लीलांचे स्मरण केल्यानेच मला प्राप्त झाल्या होत्या .

**श्रीशुक उवाच**

**एवं(म्) प्रियतमादि*ष्ट- माकर्ण्य* व्रजयोषितः ।**

**ता ऊचु*रुद्धवं(म्) प्रीतास्- त*त्स*न्देशागत*स्मृतीः ॥ 38॥**

प्रियतमा+दिष्ट, ऊचुरुद्+धवं(म्), तत्सन्+देशा+गतस्मृतीः

**श्री शुकम्हणतात -आपल्या प्रियतमाचा हा संदेशऐकून गोपीनाथ अतिशय आनंद झाला .त्यांच्या संदेशामुळे त्यांना श्रीकृष्णांचे स्वरूप आणि लिलेचे स्मरण होऊ लागले .त्या उद्धवाला म्हणाल्या .**

**गोप्य ऊचुः**

**दिष्ट्याहितो हतः(ख्) कं(म्)सो, यदूनां(म्) सानुगोऽघकृत् ।**

**दिष्ट्याऽऽप्तै*र्लब्धसर्वार्थैः(ख्), कुश*ल्यास्तेऽच्युतोऽधुना ॥ 39॥**

दिष्ट्याऽऽप्+तैर्+लब्ध+सर्वार्थैः(ख्), कुशल्यास्तेऽच्+युतोऽधुना

**गोपी म्हणाल्या -यादवांचा शत्रू पापी कंस आपल्या अनुयायांसह मारला गेला .ही अत्यंत आनंदाची गोष्ट झाली .तसेच श्रीकृष्णांच्या आप्तेष्टांचे सर्व मनोहरत पूर्ण झाले आणि ते सर्वजण आता अच्युतांसह खुशाल आहेत ,ही सुद्धा काही कमी आनंदाची गोष्ट नाही .**

**कच्चिद् गदाग्रजः(स्) सौम्य, करोति पुरयोषिताम् ।**

**प्रीतिं(न्) नः(स्) स्नि*ग्धस*व्रीड- हासोदारेक्षणार्चितः ॥ 40॥**

पुरयो+षिताम्, स्निग्ध+सव्रीड, हासोदारे+क्षणार्चितः

**हे सा धो !एक गोष्ट तुम्ही आम्हाला सांगा .ज्याप्रमाणे आम्ही आमचे प्रेमयुक्त लज्जा पूर्ण स्मितहास्य आणि त्यांच्याकडे मनसोक्त पाहणे ,या उपचारांनी त्यांची पूजा करीत होतो व तेही आमच्यावर प्रेम करीत होते ,त्याच रीतीने मथुरेतील स्त्रियांवरही ते प्रेम करतात का ?**

**कथं(म्) रतिविशे*षज्ञः(फ्), प्रिय*श्च वरयोषिताम ।**

**नानुब*ध्येत त*द्वाक्यैर्- वि*भ्रमैश्चानुभाजितः ॥ 41॥**

रतिविशे+षज्ञः(फ्), वरयो+षिताम, नानुबध्+येत, तद्+वाक्यैर्, विभ्रमैश्+चानुभा+जितः

**तोपर्यंत दुसरी म्हणाली - "अग सखी !आमचे शामसुंदर प्रेमाची मोहिनी घालण्यात निष्णात आहेत आणि श्रेष्ठ स्त्रिया ही त्यांच्यावर प्रेम करतात .तर मग जेव्हा नगरातील स्त्रिया गोड गोड बोलण्याने आणि विलासांनी त्यांची पूजा करतील ,तेव्हा ते त्यांच्यात का बरे रममान होणार नाहीत " ?**

**अपि* स्मरति नः(स्) साधो, गोवि*न्दः(फ्) प्र*स्तुते क्वचित् ।**

**गोष्ठीम*ध्ये पुरस्त्रीणां(ङ्), ग्राम्याः(स्) स्वैरकथान्तरे ॥ 42॥**

गोष्ठी+मध्ये , पुरस्+त्रीणां(ङ्), स्वै+रकथान्+तरे

**दुसरी एक जण म्हणाली - हे साधो !जेव्हा कधी नागरी स्त्रियांच्या समूहात काही गप्पा चालतात आणि आमचे प्रिय श्रीकृष्ण स्वच्छंदपणे त्यांच्या सामील होतात ,तेव्हा कधीतरी प्रसंग वसाहत आम्हा ग्रामीण गवळणींची सुद्धा ते आठवण काढतात काय ?**

ताः(ख्) किं(न्) निशाः(स्) स्मरति यासु तदा प्रियाभिर्-

वृन्दावने कुमुदकुन्दशशां(ङ्)करम्ये ।

रेमे क्वणच्चरणनूपुररासगोष्ठ्या-

मस्माभिरीडितमनोज्ञकथः(ख्) कदाचित् ॥ 43॥

कुमुदकुन्द+शशां(ङ्)करम्ये, क्वणच्+चरणनू+पुररा+सगोष्ठ्या, मस्मा+भिरी+डितमनो+ज्ञकथः(ख्)

आणखी एकीने विचारले- "जेव्हा कमळे आणि कंद फुले उमलली होती ,सगळीकडे चांदणे पसरले होते आणि त्यामुळे वृंदावन रमणीय दिसत होते ,त्या रात्री त्यांनी रासमंडल तयार करून आमच्याबरोबर नृत्य केले होते .त्यावेळी आमच्या पायातील नुपुरे वाजत होती .आम्ही सगळ्याजणी त्यांच्याच सुंदर सुंदर लीलांचे गायन करीत होतो आणि ते आमच्याबरोबर विहार करीत होते .त्या रात्रीची ते कधी आठवण काढतात का ? "

अप्येष्यतीह दाशार्हस्- तप्ताः(स्) स्वकृतया शुचा ।

सं(ञ्)जीवयन् नु नो गात्रैर्- यथेन्द्रो वनमम्बुदैः ॥ 44॥

अप्येष्+यतीह, सं(ञ्)जी+वयन्, वनमम्+बुदैः

आणखी कोणी म्हणाली-"आम्ही सगळेजणी त्यांच्या विरहागणीमध्ये पोळत आहोत.इंद्रजाप्रमाणे पाऊस पाडून वनाला जीवदान देतो,त्याप्रमाणे श्रीकृष्णसुद्धा कधीतरी आपल्या करस्पर्श इत्यादींनी आम्हाला जीवनदान देण्यासाठी येथे येतील काय ? "

कस्मात् कृष्ण इहायाति, प्राप्तराज्यो हताहितः ।

नरेन्द्रकन्या उद्वाह्य, प्रीतः(स्) सर्वसुहृद्वृतः ॥ 45॥

नरेन्द्र+कन्या, उद्+वाह्य, सर्व+सुहृद्वृतः

तोपर्यंत आणखी एक गोपी म्हणाली-"अगं !आता तर त्यांनी शत्रूंना मारून राज्य मिळविले आहे .आता ते राजकुमारीशी विवाह करून सर्व आप्तेष्टांबरोबर आनंदाने राहतील .आता इकडे कशाला येतील बरे ? "

किमस्माभिर्वनौकोभि- रन्याभिर्वा महात्मनः ।

श्रीपतेराप्तकामस्य, क्रियेतार्थः(ख्) कृतात्मनः ॥ 46॥

किमस्मा+भिर्वनौकोभि, श्रीपतेराप्+तका+मस्य

दुसरी गोपी म्हणाली-"महात्मा श्रीकृष्ण स्वतः लक्ष्मीपती आहेत.त्यांना कसलीच कामना नाही.ते कृतकृत्य आहेत .आम्ही वनवासी गवळणी किंवा दुसऱ्या राजकुमारी त्यांच्याशी त्यांना काय करायचे आहे ? "

परं(म्) सौख्यं(म्) हि नैराश्यं(म्), स्वैरिण्यप्याह पिं(ङ्)गला ।

तज्जानतीनां(न्) नः(ख्) कृष्णे, तथाप्याशा दुरत्यया ॥ 47॥

स्वै+रिण्यप्+याह, तज्जा+नतीनां(न्), तथाप्+याशा, दुरत्+यया

"संसारात कोणतीही आशा न धरणे हेच सगळ्यात मोठे सुख आहे " .असे पिंगला हिने वेश्या असूनही योग्य तेच सांगितले .हे माहीत असूनही आम्ही श्रीकृष्णांच्या भेटण्याची आशा सोडून देऊ शकत नाही .

क उत्सहेत सन्त्यक्तु-मुत्तमश्लोकसं(वँ)विदम् ।

अनिच्छतोऽपि यस्य श्री- रं(ङ्)गान्न च्यवते क्वचित् ॥ 48॥

सन्+त्यक्तु, मुत्तमश्+लोकसं(वँ)विदम् ,अनिच्+छतोऽपि

ज्यांची कीर्ती महात्मे गातात,त्यांनी एकांतात आमच्याशी ज्या प्रेमाच्या गोष्टी केल्या ,त्या विसरणे ,कोणाला शक्य आहे ?पहा ना !त्यांची इच्छा नसताना सुद्धा त्यांना वरणारी स्वतः लक्ष्मी एक क्षणभर सुद्धा त्यांना सोडून दूर जात नाही .

सरिच्छैलवनोद्देशा, गावो वेणुरवा इमे ।

सं(ङ्)कर्षणसहायेन, कृष्णेनाचरिताः(फ्) प्रभो ॥ 49॥

सरिच्छै+लवनोद्देशा, सं(ङ्)कर्षणसहा+येन, कृष्णेना+चरिताः(फ्)

उद्धव महोदय !बल रामांसह श्रीकृष्ण जेथे विहार करीत ,तीच ही नदी ,तोच हा पर्वत आणितेच ते वनप्रदेश .ज्यांना चारण्यासाठी ने त ,त्या च या गाई आणि त्यांच्या वेणूंचे ते स्वर अजूनही येथे घुमत आहेत .

पुनः(फ्) पुनः(स्) स्मारयन्ति, नन्दगोपसुतं(म्) बत ।

श्रीनिकेतैस्तत्पदकैर्- विस्मर्तुं(न्) नैव शक्नुमः ॥ 50॥

स्मा+रयन्ति, नन्दगो+पसुतं(म्), श्री+निकेतैस्+तत्पदकैर्

येथील प्रत्येक जागी त्यांच्या परमसुंदरचरण कमलांची चिन्हे उमटली आहेत.ती आम्हाला वारंवार नंदनंदनाचीच आठवण करून देतात .त्यांना आम्ही विसरूच शकत नाहीत .

गत्या ललितयोदार- हासलीलावलोकनैः ।

माध्व्या गिरा हृतधियः(ख्), कथं(न्) तं(वँ) विस्मरामहे ॥ 51॥

हासलीला+वलोकनैः, विस्+मरा+महे

त्यांची ती सुंदर चाल ,उन्मुक्त हास्य,विलास पूर्ण पहाणे आणि मधुर वाणी !या सर्वांनी आमचे चित्त हिरावून घेतले आहे .त्यांना आम्ही कशा विसरू ? "

हे नाथ हे रमानाथ, व्रजनाथार्तिनाशन ।

मग्नमुद्धर गोविन्द, गोकुलं(वँ) वृजिनार्णवात् ॥ 52॥

व्रजनाथार्+तिनाशन, मग्न+मुद्+धर, वृजिनार्+णवात्

हे स्वामी !हे लक्ष्मीनाथ !हे व्रजनाथ !आमची संकटे दूर केलीत.हे गोविंदा !दुःख सागरात बुडालेल्या या गोकुळाला तुम्हीच वाचवा . "

श्रीशुक उवाच

ततस्ताः(ख्) कृष्णसन्देशैर्- व्यपेतविरहज्वराः ।

उद्धवं(म्) पूजयां(ञ्)चक्रुर्-ज्ञात्वाऽऽत्मानमधोक्षजम् ॥ 53॥

कृष्णसन्+देशैर्, व्यपे+तविरहज्+वराः, पूजयां(ञ्)+चक्रुर्, ज्ञात्वाऽऽत्+मानमधो+क्षजम्

श्रीशुकम्हणतात -श्रीकृष्णांचा संदेश ऐकून गोपींच्या विरहाची व्यथा शांत झाली .कारण इंद्रियातील श्रीकृष्ण आपला आत्मा आहे ,हे त्यांना कळले .आता त्यांनी उद्धवाचा सत्कार केला .

**उवास कतिचिन्मासान्, गोपीनां(वँ) विनुदञ्छुचः ।**

**कृष्णलीलाकथां(ङ्) गायन्, रमयामास गोकुलम् ॥ 54॥**

कतिचिन्+मासान् ,विनुदञ्+छुचः, कृष्ण+लीला+कथां(ङ्)

गोपींचा शोक मिटवण्यासाठी उद्धव काही महिने तेथे राहिला.श्रीकृष्णांच्या अनेक लीला आणि गोष्टी वारंवार सांगून तो व्रजवासीयांना आनंदित करीत असे .

**यावन्त्यहानि नन्दस्य, व्रजेऽवात्सीत् स उद्धवः ।**

**व्रजौकसां(ङ्) क्षणप्रायाण्- यासन् कृष्णस्य वार्तया ॥ 55॥**

जितके दिवस पर्यंत नंदांच्या व्रजामध्ये उद्धव राहिला,तितके ते दिवस श्रीकृष्णांशी संबंधित गोष्टींमुळे व्रजवासीयांना क्षणासारखे वाटले .

**सरिद्वनगिरिद्रोणीर्- वीक्षन् कुसुमितान् द्रुमान् ।**

**कृष्णं(म्) सं(म्)स्मारयन् रेमे, हरिदासो व्रजौकसाम् ॥ 56॥**

सरिद्+वनगिरि+द्रोणीर्, सं(म्)स्मा+रयन्, व्रजौ+कसाम्

भगवंतांचा भक्त उद्धव नदी ,वन ,पर्वत,दर्या आणि फुलांनी लहडलेले वृक्ष पाहून तेथे श्रीकृष्णांनी कोणती लीला केली होती ,असे विचारून विचारून प व्रजवासीयांनाश्रीकृष्णांचे स्मरण करून देऊन त्या स्मरणात त्यांच्यासह स्वतः रमत असे .

**दृष्ट्वैवमादि गोपीनां(ङ्), कृष्णावेशात्मविक्लवम् ।**

**उद्धवः(फ्) परमप्रीतस्-ता नमस्यन्निदं(ञ्) जगौ ॥ 57॥**

दृष्ट्वै+वमादि, कृष्णा+वेशात्+मविक्+लवम्, नमस्+यन्+निदं(ञ्)

उद्योवाने गोपींची अशा प्रकारची श्रीकृष्णांमध्येच तन्मयता झाल्याचे पाहून त्याचेही मन कृष्ण विषयक प्रेमाने अतिशय भरून गेले .गोपींना नमस्कार करित तो असे म्हणाला .

**एताः(फ्) परं(न्) तनुभृतो भुवि गोपवध्वो**

**गोविन्द एव निखिलात्मनि रूढभावाः ।**

**वाञ्छन्ति यद् भवभियो मुनयो वयं(ञ्) च**

**किं(म्) ब्रह्मजन्मभिरनन्तकथारसस्य ॥ 58॥**

निखिलात्+मनि, ब्रह्मजन्म+भिरनन्त+कथा+रसस्य

"फक्त या गोपींचेच शरीर धारण करणे या पृथ्वीवर सार्थकी लागले,कारण सर्वां त्माभगवान श्रीकृष्णांच्या ठिकाणीच यांचे प्रगाढ प्रेम आहे .प्रेमाच्या या स्थितीची मुमुक्षु पुरुष आणि आम्ही भक्त सुद्धा अपेक्षा करतो .ज्यांना भगवान श्रीकृष्णांच्या कथांची गोडी लागली,त्यांना ब्रह्मदेवांसारख्या श्रेष्ठ जन्माची तरी काय आवश्यकता ?

क्वेमाः(स्) स्त्रियो वनचरीर्व्यभिचारदुष्टाः(ख्)

कृष्णे क्व चैष परमात्मनि रूढभावः ।

नन्वीश्वरोऽनुभजतोऽविदुषोऽपि साक्षाच्-

छ्रेयस्तनोत्यगदराज इवोपयुक्तः ॥ 59॥

वनचरीर्+व्यभिचा+रदुष्टाः(ख्), नन्वीश्+वरोऽ+नुभजतोऽ+विदुषोऽपि, छ्रेयस्+तनोत्+यगदराज

कोठे ह्या आचारहीन ,रानात राहणाऱ्या स्त्रिया आणि कोठे सच्चिदानंद घन भगवान श्रीकृष्णांचे ठाई त्यांचे हे अनन्य प्रेम !जसे एखाद्याने अजानतेपणाने अमृतप्राशन केले तरी ते पिणाऱ्याला अमर करते ,त्याप्रमाणे जर कोणी भगवंतांचे स्वरूप न जाणताही त्यांच्यावर निरंतर प्रेम केले ,तर ते स्वतः त्याचे परम कल्याण करतात.

नायं(म्) श्रियोऽङ्ग उ नितान्तरतेः(फ्) प्रसादः(स्)

स्वर्योषितां(न्) नलिनगन्धरुचां(ङ्) कुतोऽन्याः ।

रासोत्सवेऽस्य भुजदण्डगृहीतकण्ठ-

लब्धाशिषां(यँ) य उदगाद् व्रजबल्लवीनाम् ॥ 60॥

नितान्+तरतेः(फ्), स्वर्+योषितां(न्), नलिन+गन्ध+रुचां(ङ्),

रासोत्+सवेऽस्य, भुजदण्ड+गृही+तकण्ठ, लब्धा+शिषां(यँ), व्रजबल्+लवीनाम्

रासलीलेच्या वेळी भगवान श्रीकृष्णांनी या गोपींच्या गळ्यात हात टाकून यांना जो कृपाप्रसाद दिला ,तसा परम प्रेम करणाऱ्या लक्ष्मीला सुद्धा दिला नाही किंवा कमला सारख्या सुगंध आणि कांतीने युक्त अशा देवांगणांना सुद्धा मिळाला नाही ;तर मग अन्य स्त्रियांची काय कथा !

आसामहो चरणरेणुजुषामहं(म्) स्यां(वृँ)

वृन्दावने किमपि गुल्मलतौषधीनाम् ।

या दुस्त्यजं(म्) स्वजनमार्यपथं(ञ्) च हित्वा

भेजुर्मुकुन्दपदवीं(म्) श्रुतिभिर्विमृग्याम् ॥ 61॥

चरणरे+णुजुषा+महं(म्), गुल्मलतौ+षधीनाम्, दुस्+त्यजं(म्),

स्वजनमार्+यपथं(ञ्), भेजुर्मुकुन्+दपदवीं(म्), श्रुतिभिर्+विमृग्+याम्

मी या वृंदावनामध्ये एखादे झुडूप ,वेल किंवा वनस्पती झालो ,तरी ते मी माझे भाग्य समजे न .कारण त्यामुळे मला या व्र जांगणाचीचरण धूळ सेवन करण्यास मिळेल .ज्यांनी सोडण्यास कठीण असा सजनांचा मोह आणि शिष्टाचार सोडून भगवंतांचे पद प्राप्त करून घेतले की ,जे वेदांनाही अद्यापि सापडलेले नाही .

या वै श्रियार्चितमजादिभिराप्तकामैर्-

योगेश्वरैरपि यदात्मनि रासगोष्ठ्याम् ।

कृष्णस्य तद् भगवतश्चरणारविन्दं(न्)

न्यस्तं(म्) स्तनेषु विजहुः(फ्) परिरभ्य तापम् ॥ 62॥

श्रियार्+चितमजा+दिभिराप्+तकामैर्, योगेश्+वरै+रपि,

रासगोष्+ठ्याम्, भगवतश्+चरणा+रविन्दं(न्)

स्वतः लक्ष्मीने व ब्रह्मदेव ,शंकर इत्यादी पूर्ण काम देवांनी ज्यांची पूजा केली ,योगेश्वर आपल्या हृदयामध्ये ज्यांचे सदैव चिंतन करीत असतात ,त्याच भगवान श्रीकृष्णांच्या चरणार विंदांना गोपींनी रासलीलेच्यावेळी आपल्या वक्षःस्थळावर ठेवून घेतले आणि त्यांनाच आलिंगन देऊन आपल्या हृदयाचा ताप शांत केला.

वन्दे नन्दव्रजस्त्रीणां(म्),पादरेणुमभीक्ष्णशः ।

यासां(म्) हरिकथोद्गीतं(म्), पुनाति भुवनत्रयम् ॥ 63॥

नन्दव्रजस्+त्रीणां(म्), पादरे+णुमभी+क्ष्णशः, हरिकथोद्+गीतं(म्)

नंदांच्या रजात राहणाऱ्या गोपांगणाच्या चरण धुळीला मी वारंवार नमस्कार करतो.ज्या गोपींनी श्रीकृष्णांच्या कथासंबंधी जे काही गायन केले ,ते तिन्ही लोकांना पवित्र करीत आहे .

श्रीशुक उवाच

अथ गोपीरनुज्ञाप्य, यशोदां(न्) नन्दमेव च ।

गोपानामन्त्र्य दाशार्हो, यास्यन्नारुरुहे रथम् ॥ 64॥

गोपी+रनुज्ञाप्य, गोपाना+मन्त्र्य, यास्यन्+नारुरुहे

श्री शुक म्हणतात -नंतर उद्धव गोपी,नंद आणि यशोदा यांची अनुमती घेऊन आणि गोपाळांचा निरोप घेऊन मथुरेला जाण्यासाठी रथावर स्वार झाला .

तं(न्) निर्गतं(म्) समासाद्य, नानोपायनपाणयः ।

नन्दादयोऽनुरागेण, प्रावोचन्नश्रुलोचनाः ॥ 65॥

नानोपा+यनपा+णयः, नन्दा+दयोऽ+नुरागेण, प्रावो+चन्+नश्रुलो+चनाः

तो निघालेला पाहून नंद इत्यादी गोपगण हातात पुष्कळशा भेटवस्तू घेऊन त्याच्याजवळ आले आणि डोळ्यात अश्रू आणून मोठ्या प्रेमाने म्हणाले .

मनसो वृत्तयो नः(स्) स्युः(ख्) कृष्णपादाम्बुजाश्रयाः ।

वाचोऽभिधायिनीर्नाम्नां(ङ्) कायस्तत्प्रह्वणादिषु ॥ 66॥

कृष्णपादाम्+बुजाश्रयाः, वाचोऽ+भिधा+यिनीर्+नाम्नां(ङ्), कायस्+तत्प्रह्+वणा+दिषु

"आमच्या मनाच्या वृत्ती श्रीकृष्णांच्या चरण कमलांच्या आश्रयाने राहोत. आमच्या वाणी त्यांच्याच नामांचे उच्चारण करोत आणि शरीरे त्यांनाच प्रणाम इत्यादी करीत राहोत.

कर्मभिर्भ्राम्यमाणानां(यँ), यत्र क्वापीश्वरेच्छया ।

मं(ङ्)गलाचरितैर्दानै, रतिर्नः(ख्) कृष्ण ईश्वरे ॥ 67॥

कर्मभिर्+भ्राम्+यमाणानां(यँ), क्वापीश्+वरेच्छया, मं(ङ्)गला+चरितैर्दानै

भगवंतांच्या इच्छेने आमच्याकर्मानुसार आम्हाला कोणत्याही योनीमध्ये जन्म येवो,मात्र तेथे आम्ही शुभ आचरण करावे ,दान करावे आणि त्यांचे फळ म्हणून भगवान श्रीकृष्णांचे ठाईचा आमचे प्रेम असावे . "

**एवं(म्) सभाजितो गोपैः(ख्), कृष्णभक्त्या नराधिप ।**

**उद्धवः(फ्) पुनरागच्छन्- मथुरां(ङ्) कृष्णपालिताम् ॥ 68॥**

पुनरा+गच्छन्, कृष्णपा+लिताम्

परीक्षिता !गोपांनी अशा प्रकारे कृष्णाप्रमाणेच समजून उद्धवाचा सन्मान केला .नंतर श्रीकृष्णांनी रक्षण केलेल्या मथुरेला तो परतला .

**कृष्णाय प्रणिपत्याह, भक्त्युद्रेकं(वँ) व्रजौकसाम् ।**

**वसुदेवाय रामाय, राज्ञे चोपायनान्यदात् ॥ 69॥**

प्रणिपत्+याह, भक्+त्युद्रेकं(वँ), व्रजौ+कसाम् , चोपा+यनान्+यदात्

तेथे पोहोचल्यावर त्याने भगवान श्रीकृष्णांना नमस्कार केला आणि व्रजवासीयांचीप्रगाढ भक्ती त्यांना कथन केली.त्यानंतर नंदांनी दिलेल्या भेटवस्तू त्याने वसुदेव , बलराम आणि राजा उग्रसेनाला दिल्या .

**॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे पारमहं(म्)स्यां(म्) सं(म्)हितायां(न्)**

**दशमस्कन्धे पूर्वार्धे उद्धवप्रतियाने सप्तचत्वारिं(म्)शोऽध्यायः॥**

**ॐ पूर्णमदः(फ्) पूर्णमिदं(म्)पूर्णात्पूर्णमुदच्यते**

**पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥**

**ॐ शान्तिः(श्)शान्तिः(श्)शान्तिः ॥**